# रस्ते अपघात

महाराष्ट्रात सरासरीने दररोज २१२ रस्ते अपघात होतात आणि त्यात दररोज २४ व्यक्ती मरण पावतात. तर १४५ व्यक्ती जखमी होतात. सर्वसाधारणपणे अपघातात मरण पावणाऱ्यांपैकी ३० टक्के व्यक्तींचे वय ३० वर्षांपेक्षा कमी असते असे आढळून आलेले आहे. म्हणजे जीवनाच्या ऐन उमेदीत असणाऱ्यांच्या मृत्यूचे प्रमाण बरेच जास्त आहे. यावर काही उपाययोजना केली नाही तर हे अपघाताचे प्रमाण असेच वाढत जाणार हे उघड आहे.

## अपघात का व कशामुळे होतात

रस्त्यांवरील अपघात सर्वसाधारणपणे खालील चार कारणांमुळे होतात.

### १. वाहनांतील दोष :

उदा : चालत्या गाडीचा टाय रॉड तुटणे, समोरची चाके निखळणे किंवा ब्रेक निकामी होणे असे प्रकार घडत असल्यास वाहनचालकाचा ताबा राहत नाही व त्याच्या परिणामी अपघात होतात.

### २. वाहनचालकाची चूक :

उदा : नको त्या ठिकाणी ओव्हरटेक करणे, सिग्नल न देता किंवा आधी खूण न करता अचानक वळण घेणे किंवा थांबणे जेणे करुन मागील वाहन समोरच्या वाहनावर आदळते. वेग मर्यादेचे पालन न करता गावातून बेफाम वेगाने जाणे, मोटार चालविताना झोप येणे, अति वेगाने जात असताना वळण वक्रतेची कल्पना न आल्यामुळे वाहन उलटणे, मद्यप्राशनानंतर मोटार वाहन चालविणे इत्यादी.

### ३. रस्त्यांच्या सभोवतालची परिस्थिती :

उदा. बैलगाड्या, सायकली, रिक्शा यासारख्या अन्य वाहनांच्या चालकाची चूक होणे, रस्त्यावर अचानक जनावरे येणे, रस्त्यावरील पादचारी व्यक्ती किंवा शाळेतील मुले यांचे लक्ष नसल्यामुळे ती वाहनाखाली येणे इत्यादी.

### ४. रस्त्यांमधील दोष :

पोलिस स्टेशनमध्ये नोंद झालेल्या अपघातांचा अभ्यास करता असे लक्षात येते की, रस्त्यांमधील दोषांमुळे झालेल्या अपघातांची संख्या एकूण अपघातांच्या संख्येच्या १० ते १५ टक्के इतकीच असते. अपघातांची कारणमीमांसा करण्यात काही चूक असू शकते हे लक्षात घेतले तरीही रस्तांमधील दोषामुळे होणाऱ्या अपघातांची एकूण संख्या अपघातांच्या संख्येच्या २० टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही.



### ५. लक्षात ठेवा :

अपघात कधीही आपोआप घडत नाही. त्यासाठी काहीना काही कारण आणि कोणीना कोणी जबाबदार असतो. अपघात हे जास्त करुन आपल्या स्वतःच्या चुकांमुळे होतात. जर सावधपणा अंमलात आणला, घाई टाळली आणि वाहतुकीच्या नियमांचे पालन केले, तर बरेचसे अपघात टळू शकतात.

## आपत्ती जोखीम व्यवस्थापन कार्यक्रम

निवासी उपजिल्हाधिकारी, यवतमाळ तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यवतमाळ

जिल्हाधिकारी, यवतमाळ तथा
अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन
प्राधिकरण, यवतमाळ

जिल्हाधिकारी कार्यालय यवतमाळ नियंत्रण कक्ष, फोन : (०७२३२) २४२४८८, २४२३०३, २४०८४४, टोल फ्रि क्र. १०७७

द्वारा जनहितार्थ प्रकाशित